12 FEB 2026

सकाळ

# इंडियन स्ट्रक्चरल इंजिनिअर्सतर्फे शनिवारी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ११ : इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअर्स (आयएसएसई) कोल्हापूर सेंटरतर्फे शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. १४) राष्ट्रीय कार्यशाळा होणार आहे. त्यात स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमधील प्रस्तावित सुधारणांवर चर्चा केली जाणार असल्याची माहिती 'आयएसएसई' कोल्हापूरचे अध्यक्ष प्रशांत हडकर यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.


आयएसएसई, विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ अप्लाईड मेकॅनिक्स, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगलीतर्फे कार्यशाळा होणार आहे. त्यात आयआयटी रुरकीमधील भूकंप अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक योगेंद्रसिंग आणि पुणे येथील थॉमटन टोमासेट्टीचे उपाध्यक्ष व स्ट्रक्चरल इंजिनिअर डॉ. विजय खोसे मार्गदर्शन करणार असल्याचे आयएसएसई कोल्हापूरचे माजी अध्यक्ष प्रशांत हावळ यांनी सांगितले. कार्यशाळेत सिव्हिल इंजिनिअर्स, स्ट्रक्चरल कन्सल्टंट, आदींनी सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे समन्वयक प्रा. महेश साळुंखे यांनी केले. वालचंद कॉलेजच्या डॉ. रश्मी जाधव, आयएसएसई कोल्हापूरचे सचिव जिया मोमीन उपस्थित होते.

12 FEB 2026

जनप्रवास

# स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमधील प्रस्तावित सुधारणाबाबत कार्यशाळेचे आयोजन

- शिवाजी विद्यापीठात शनिवारी आयोजन
- पत्रकार परिषदेत माहिती



**जनप्रवास : कोल्हापूर**

इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्स कोल्हापूर सेंटरच्यावतीने कोल्हापूरात १४ फेब्रुवारीरोजी शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय स्तरावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे, अशी माहिती इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्सचे चेअरमन प्रशांत हडकर आणि प्रशांत हावळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत अधिक माहिती देताना प्रशांत हडकर यांनी सांगितले की, इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्स, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डिपार्टमेंट ऑफ अप्लाईड मेकॅनिक्स वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेत सिव्हिल इंजिनिअर्स, स्ट्रक्चरल कन्सल्टंट, शिक्षणतज्ञ आणि उद्योग तज्ञासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग मधील प्रस्तावित सुधारणाबाबत प्रोफेसर योगेंद्रसिंग यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी चर्चासत्रही होणार आहे. तसेच, सुप्रसिद्ध स्ट्रक्चरल इंजिनीअर डॉ. विजय खोसे हे डिझाईन प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत, असेही यावेळी सांगण्यात आले. शिवाजी विद्यापीठात १४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनउ ते सायंकाळी साडेपाच पर्यत ही कार्यशाळा चालणार आहे.

दरम्यान, पृथ्वीच्या अंतरंगातील विविध बदलामुळे अलिकडच्या काळात भूकंप होण्याचे प्रमाण वाढले असून संभाव्य भूकंपाचा धोका ओळखून भूकंपरोधक बांधकामे बांधण्याबाबत कार्यशाळेत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग समन्वयक प्रा. महेश साळुंखे, डिपार्टमेंट ऑफ अप्लाइड मॅकॅनिक्स वालचंद कॉलेज ऑफ इंजिनअरींग सांगलीचे विभाग प्रमुख सचिन कदम, मंदार आंबेकर, जिया मोमीन, रणजित जाधव, निरंजन वायचळ, सचिन मेहता उपस्थित होते.

1 2 FEB 2026

पुढारी

# केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता समाजाच्या प्रश्नांवर काम करा : प्रा. गोरे

**कोल्हापूर :** केवळ पुस्तकी ज्ञान न मिळवता समाजाच्या प्रश्नांवर काम केल्यास व्यक्तिमत्त्व विकास होतो आणि नोकरीच्या संधीही वाढतात, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निवृत्त प्रा. अनिल गोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने 'स्टॅटिस्टिकल एक्सप्लोरेशन ऑफ रिअल प्रॉब्लेम्स' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. याप्रसंगी प्रा. गोरे यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सॉफ्ट स्किल्स, संभाषण कौशल्य आणि गुगल व एआयचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला. याप्रसंगी कार्यक्रमात सांख्यिकी या विषयाचा दैनंदिन जीवनातील व सामाजिक समस्या सोडवण्यासाठी होणारा वापर यावर चर्चा करण्यात आली. प्रा. शशिभूषण बी. महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुवर्णा गोडसे-पाटील यांच्या आभार मानले.

1 2 FEB 2026

पुढारी

# पर्यावरण वाचले तरच माणूस वाचेल : डॉ. कुंभार

**कोल्हापूर :** पर्यावरण वाचले तरच माणूस वाचेल, म्हणून पर्यावरण समजून घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन पर्यावरण अभ्यासक डॉ. सुधीर कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने कोते (ता. राधानगरी) येथील शासकीय आश्रमशाळेत आदिवासी आश्रमशाळा स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि पर्यावरण या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. केंद्राचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. डॉ. कुंभार म्हणाले, वणवा पेटवू नका. वणवा लागला तर तो कसा विझवायचा, हे शिकून घ्या. वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा. सर्प शेतकऱ्याचा, आपला मित्र आहे, त्यांना मारू नका. याप्रसंगी सीड बॉल्स तसेच गांडूळ खत तयार करण्याची प्रक्रिया, जलसंवर्धनाची प्रक्रिया त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. यावेळी अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक जगन्नाथ दराडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 FEB 2026

तरुण भारत

# उत्तरपत्रिकांची ऑनस्क्रीन तपासणी होणार अधिक व्यापक

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : उन्हाळी सत्रात बीसीए, बीबीए अभ्यासक्रमांचा समावेश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील पारंपरिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित असलेले उत्तरपत्रिकांच्या 'ऑन-स्क्रीन मूल्यमापन' तंत्रज्ञान आता व्यावसायिक अभ्यासक्रमांपर्यंत विस्तारले जाणार आहे. येत्या उन्हाळी सत्रात बीसीए व बीबीए अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकाही ऑन-स्क्रीन पद्धतीने तपासण्याची तयारी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सुरू केली आहे.

ऑक्टोबरनोव्हेंबर २०२४ या सत्रात पहिल्यांदाच ऑन-स्क्रीन तपासणीची अंमलबजावणी करण्यात आली होती. परीक्षक आणि प्रशासन दोघांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर पुढील सत्रांमध्ये टप्प्याटप्प्याने या प्रणालीचा विस्तार करण्यात आला. बी. फार्मसी, एम. फार्मसी, बी. टेक., एम. टेक., एमबीए, एमसीए (इंजिनिअरिंग व सायन्स), बी.एस्सी., एम.एस्सी., नॅनो सायन्स, एमएसडब्ल्यू, तसेच यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटअंतर्गत एमआरएस. अशा अनेक अभ्यासक्रमांचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

मार्च -एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्रातील परीक्षांमध्ये बीसीए आणि बीबीए अभ्यासक्रमांचा समावेश झाल्यास ऑन-स्क्रीन तपासणी होणाऱ्या उत्तरपत्रिकांची संख्या सुमारे साडेचार लाखांपर्यंत पोहोचणार आहे.

### कमी वेळेत निकाल

या आधुनिक प्रणालीमुळे परीक्षकांना आपल्या महाविद्यालयातून किंवा जवळच्या केंद्रावरूनच मूल्यमापन करता येते. त्यामुळे प्रवासाचा वेळ व खर्च कमी होत असून, तपासणीतील गोपनीयता, अचूकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. याचाच परिणाम म्हणून कमी कालावधीत निकाल जाहीर करणे परीक्षा मंडळाला शक्य होत आहे.

### आकडेवारी थोडक्यात :

वर्षभरातील एकूण परीक्षा : सुमारे १६००
एकूण उत्तरपत्रिका : अंदाजे ३० लाख
ऑन-स्क्रीन तपासणीतील उत्तरपत्रिका : ४ लाखांहून अधिक

### ऑन-स्क्रीन तपासणी कशी होते?

'ओएसएम' प्रणालीत उत्तरपत्रिका स्कॅन करून पीडीएफ स्वरूपात साठवण्यात येतात. प्रत्येक उत्तरपत्रिकेला सांकेतिक क्रमांक दिला जातो. परीक्षक लॉगिन केल्यानंतर त्यांना यादृच्छिक पद्धतीने उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध होते. मूल्यमापन करताना प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तरे आणि प्रश्ननिहाय गुणरचना प्रणालीमध्येच उपलब्ध असल्याने तपासणी अधिक सुलभ आणि पारदर्शक होते. या उपक्रमामुळे विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थेत डिजिटल परिवर्तनाचा नवा टप्पा सुरू झाला असून, भविष्यात आणखी अभ्यासक्रमांचा यात समावेश होण्याची शक्यता आहे.

12 FEB 2026

जनप्रवास

# तीन परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर - २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा ३ नोव्हेंबरपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. ११ फेब्रुवारीरोजी बीएसस्सी, पी.जी. डिप्लोमा इन इंड्रस्टीयल सेफ्टी, एमबीए या चार अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध ३ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी १८७ विद्यार्थी उपस्थित होते. ११ फेब्रुवारीरोजी तीन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले असून आजअखेर ७०२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले, अशी माहिती संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

12 FEB 2026

तरुण भारत

# विद्यापीठामध्ये स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगवर कार्यशाळा

**कोल्हापूर:** सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्स कोल्हापूर सेंटरच्या वतीने, कोल्हापुरात राष्ट्रीय स्तरावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवारी शिवाजी विद्यापीठामधील फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये करण्यात आले आहे, अशी माहिती कोल्हापूर सेंटरचे चेअरमन इंजिनिअर प्रशांत हडकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही कार्यशाळा इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनियर्स कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डिपार्टमेंट ऑफ अप्लाइड मेकॅनिक, वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअर सांगली यांच्यातर्फे होणार आहे.

12 FEB 2026

पुढारी

# चित्रपटनिर्मितीचा ध्यास बाळगा : रणजित जाधव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने चित्रपटनिर्मितीचा अभ्यासक्रम सुरू करून कोल्हापूरची या क्षेत्रातील ओळख अधिक ठळक केली आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेत प्रचंड मेहनत घेऊन चित्रपटनिर्मितीचा ध्यास बाळगावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे संचालक रणजित जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी महामंडळाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी ते बोलत होते. जाधव म्हणाले, चित्रपट निर्मितीसाठी शास्त्रीय प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. शिवाजी विद्यापीठाने ती सोय केल्याने विद्यार्थ्यांना आता चित्रपटनिर्मिती करणे अधिक सुलभ बनले आहे. दिग्दर्शक सतीश बीडकर म्हणाले, चित्रपटनिर्मिती करत असताना चित्रपटाच्या सर्व तांत्रिक व अन्य बाबींची सखोल माहिती करून घ्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी चित्रपट महामंडळाची संस्थात्मक संरचना समजून घेतली. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब खाडे, अनुप जत्राटकर आदींनी अभ्यास भेटीचे नियोजन केले. व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी स्वागत केले. यावेळी नम्रता गोडबोले, सिद्धेश मंगेशकर आदी उपस्थित होते.

12 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निकोप समाजासाठी जबाबदार लैंगिक वृत्तांकन आवश्यक : अबोली

## शिवाजी विद्यापीठात लैंगिकता-जबाबदार वार्तांकनवर कार्यशाळा

- प्रत्येक व्यक्तीला आनंददायी सुरक्षित लैंगिक संबंध ठेवण्याचा हक्क
- पालकांकडून पाल्यांमध्ये जागृती करणे आवश्यक
- लैंगिकतेची पुरेशी ओळख करून घेणे आवश्यक




कोल्हापूर : लैंगिकता-जबाबदार वार्तांकन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना अबोली आणि डॉ. तृप्ती दरक.

**जनप्रवास : कोल्हापूर**

निकोप समाजासाठी माध्यमांकडून जबाबदार लैंगिक वृत्तांकन होणे अपेक्षित आहे, असे मत पुणे येथील मानसशास्त्र समुपदेशक अबोली यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. किर्लोस्कर ऑइल इंजिन, प्रयास आणि मानस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली होती.

यावेळी अबोली म्हणाल्या, जन्म झाल्यापासून लैंगिकता सुरू होते. नंतर वयापरत्वे त्यामध्ये बदल होत जातात. लैंगिकतेचा प्रवास प्रौढपणाच्या आधीपासूनचा असतो. शरीरात घडणाऱ्या बदलांबाबत पालकांकडून पाल्यांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीला आनंददायी सुरक्षित लैंगिक संबंध ठेवण्याचा हक्क आहे. त्याचा आपण सन्मान केला पाहिजे. तसेच लैंगिकतेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ऑडिओ-व्हिडिओ प्रसारित करणे गरजेचे आहे.

प्रयास सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. तृप्ती दरक यांनी लैंगिकतेसंदर्भात वैज्ञानिक आणि शास्त्रीय माहिती दिली. लैंगिकतेची पुरेशी ओळख करून घेणे आवश्यक आहे. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले.

सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन तेजश्री शिंदे हिने केले. आभार मानस संस्थेच्या अध्यक्ष स्मिता पवार यांनी मानले. याप्रसंगी माहिती आणि जनसंपर्क विभागाचे निवृत्त संचालक वसंतराव शिर्के, पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. राजश्री साकळे, सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, डॉ. अनमोल कोठाडिया, अश्विनी पाटील, अमोल मिणचेकर, त्याचबरोबर मास कम्युनिकेशन विभाग, महावीर महाविद्यालय, सायबर, मानसशास्त्र आणि एमएसडब्ल्यू विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

### मुलांना समजेल अशा भाषेमध्ये चर्चा व्हावी

लैंगिक कल आणि लैंगिकतेची ओळख या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. समाजात लिंगभावाची चौकट तयार करण्यात आली आहे. या चौकटीमधूनच सर्व गोष्टी पाहिल्या जातात. लैंगिकतेला पूर्वग्रह ठेवून पाहिले गेल्यामुळे त्याबद्दल जास्त गैरसमजुती निर्माण झाल्या आहेत. कोणत्याही व्यक्तीला लैंगिक आकर्षण असणे ही नैसर्गिक गोष्ट आहे, परंतु गैरसमजुतीमुळे त्याकडे विशेष महत्त्व देऊन बघितले जात नाही. त्यामधूनच पुरुषत्व किंवा स्त्रीत्व या चौकटीमधून बघण्याची सवय झाली आहे. सामाजिक चौकट निर्माण करण्याची सुरुवात घरापासूनच होते. यासाठी घरातही लैंगिकतेसंदर्भात मुलांना समजेल अशा भाषेमध्ये चर्चा होणे आवश्यक आहे, असे डॉ. दरक म्हणाल्या.

### विपर्यास करणाऱ्या बातम्या कितपत दाखवाव्या याचा विचार केला पाहिजे

यावेळी समुपदेशक अबोली यांनी सांगितले की, लैंगिक संबंध, नातेसंबंध आणि भाव-भावना यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. माध्यमांमधून विविध प्रकारच्या लैंगिकतेविषयीच्या धारणा तयार होण्यास मदत होते. त्यामध्ये बऱ्याचदा चुकीच्या पद्धतीने धारणा तयार होतात आणि त्यांचे गंभीर परिणाम होऊ शकतात. यातूनच पॉर्नोग्राफीसारखे प्रकार पाहावयास मिळतात. माध्यमांनी लैंगिकतेसंदर्भात संवेदनशीलपणे वृत्तांकन करून सजग, समंजस आणि निकोप समाज निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मीडियाने समाजातील महत्त्वाचा घटक म्हणून लैंगिकतेचा विपर्यास करणाऱ्या बातम्या कितपत दाखवाव्या, याचा विचार केला पाहिजे.

12 FEB 2026
पुण्यनगरी

# निकोप समाजासाठी जबाबदार लैंगिक वृत्तांकन आवश्यक : अबोली

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

निकोप समाजासाठी माध्यमांकडून जबाबदार लैंगिक वृत्तांकन होणे अपेक्षित आहे, असे मत पुणे येथील मानसशास्त्र समुपदेशक अबोली यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात 'लैंगिकता-जबाबदार वार्तांकन' या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. किर्लोस्कर ऑईल इंजिन, प्रयास आणि मानस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित केली होती.

अबोली म्हणाल्या, जन्म झाल्यापासून लैंगिकता सुरू होते. नंतर वयापरत्वे त्यामध्ये बदल होत जातात. लैंगिकतेचा प्रवास प्रौढपणाच्या आधीपासूनचा असतो. शरीरात घडणाऱ्या बदलांबाबत पालकांकडून पाल्यांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे.

प्रयास सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. तृप्ती दरक म्हणाल्या, लैंगिकतेची पुरेशी ओळख करून



घेणे आवश्यक आहे. लैंगिक संबंध, नातेसंबंध आणि भावभावना यांचा एकत्रित विचार केला पाहिजे.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन तेजश्री शिंदे हिने केले. आभार मानस संस्थेच्या अध्यक्ष स्मिता पवार यांनी मानले. याप्रसंगी माहिती आणि जनसंपर्क विभागाचे निवृत्त संचालक वसंतराव शिर्के, पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. राजश्री साकळे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. अमोल मिणचेकर यांच्यासह विविध विभागांतील विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
12 FEB 2026 सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साहित्य, समाज, वास्तवाशी जोडलेले चित्रपट हे प्रभावी माध्यम

## डॉ. द सिल्वा; विद्यापीठात ल्युसोफोन चित्रपट महोत्सव सुरू

कोल्हापूर, ता. ११ : चित्रपट हे साहित्य, समाज आणि वास्तव जीवनाशी जोडलेले प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन लिस्बन (पोर्तुगाल) येथील कमॉईश इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी आज येथे केले. पोर्तुगालचे भारताशी असलेले जुने संबंध, तसेच या मैत्रिपूर्ण संबंधांचे महत्त्व त्यांनी यावेळी उलगडले.

शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा अधिविभाग आणि कमॉइश इन्स्टिट्यूटतर्फे घेतल्या जाणाऱ्या चौदाव्या ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन द सिल्वा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी चित्रपटांमधून विविध देशांचे धर्म, संस्कृती, भाषा आणि मानवी अनुभव समजून घेता येतात. कल्पनारम्य कथादेखील वास्तव जीवनातूनच जन्म घेतात आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देतात, असे सांगितले.

कुलसचिव डॉ. शिंदे यांनी चित्रपट हे जागतिक भाषा, संस्कृती, भूगोल आणि इतिहास समजून घेण्याचे प्रभावी माध्यम आहे. मराठा साम्राज्याच्या इतिहासात पोर्तुगीजांच्या ऐतिहासिक संदर्भांची मोलाची मदत झाल्याचे सांगितले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे यांनी कमॉइश इन्स्टिट्यूटसोबतच्या सामंजस्य कराराची माहिती दिली. माजी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी पोर्तुगाल भेटीचा अनुभव आणि गतवर्षी आयोजित पोर्तुगीज व ब्राझिलियन चित्रपट महोत्सवांचे स्मरण करून दिले. इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, स्नेहल शेट्ये, आदी उपस्थित होते. अदिती दळवी यांनी सूत्रसंचालन केले. ज्योती पाटील यांनी आभार मानले.

या चित्रपट महोत्सवात तीन दिवसांत जागतिक पुरस्कारप्राप्त पोर्तुगीज आणि ब्राझिलियन अशा दहा चित्रपटांचे प्रदर्शन होणार आहे. विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थी त्यात सहभागी झाले आहेत. या महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सरवदे यांनी केले.

12 FEB 2026
तरुण भारत

# 'चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगा'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने चित्रपट निर्मितीचा अभ्यासक्रम सुरु करून कोल्हापूरची या क्षेत्रातील ओळख अधिक ठळक केली आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेत प्रचंड मेहनत घेऊन चित्रपट निर्मितीचा ध्यास बाळगावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे संचालक रणजित जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी मराठी चित्रपट महामंडळाच्या कार्यालयाला भेट दिली. यावेळी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी यावेळी चित्रपट महामंडळाची संस्थात्मक संरचना समजून घेतली. चित्रपट निर्मितीतील संघटनात्मक आणि व्यावसायिक पैलूंची यावेळी माहिती देण्यात आली. जाधव म्हणाले, चित्रपट महामंडळाचे चित्रपट सृष्टीच्या विकासात मोठे योगदान आहे. कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते व दिग्दर्शक यांच्या हक्कांसाठी महामंडळ नेहमीच प्रयत्नशील असते. चित्रपट निर्मितीसाठी शास्त्रीय प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब खाडे, अनुप जत्राटकर आदींनी अभ्यास भेटीचे नियोजन केले. व्यवस्थापक रवींद्र बोरगावकर यांनी स्वागत केले. यावेळी दिग्दर्शक सतीश बीडकर, नम्रता गोडबोले, सिद्धेश मंगेशकर आदी उपस्थित होते.

1 2 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लैंगिक विषयाचे वृत्तांकन करताना काळजी बाळगा

## समुपदेशक अबोली : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लैंगिकतेचा विपर्यास करणाऱ्या वृत्तांमुळे चुकीच्या माहितीचा प्रसार धोकादायक ठरू शकतो. परिणामी, माध्यमांनी लैंगिक विषयावर वृत्तांकन करताना योग्य ती काळजी बाळगावी. लैंगिकतेसंदर्भात संवेदनशीलपणे वृत्तांकन करून सजग, समंजस आणि निकोप समाज निर्माण कसा होईल, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे मत पुणे येथील मानसशास्त्र समुपदेशक अबोली यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात आयोजित 'लैंगिकता : जबाबदार वार्तांकन' या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. किर्लोस्कर ऑईल इंजिन, प्रयास आणि मानस या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी ही कार्यशाळा घेण्यात आली.

अबोली म्हणाल्या, जन्म झाल्यापासून लैंगिकता सुरू होते. वयोपरत्वे त्यामध्ये बदल होत जातात.





**कोल्हापूर : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना समुपदेशक अबोली आणि डॉ. तृप्ती दरक. (छाया : नाज ट्रेनर)**

लैंगिकतेचा प्रवास प्रौढपणाच्या आधीपासूनचा असतो. शरीरात घडणाऱ्या बदलांबाबत पालकांकडून पाल्यांमध्ये जागृती करणे आवश्यक आहे. लैंगिकतेची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ऑडीओ-व्हिडीओ प्रसारित करणे गरजेचें आहे.

प्रयास सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. तृप्ती दरक यांनी लैंगिकतेसंदर्भात वैज्ञानिक आणि शास्त्रीय माहिती दिली. लैंगिकतेची पुरेशी ओळख करून घेणे आवश्यक आहे. लैंगिक संबंध, नातेसंबंध आणि भाव-भावना यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. माध्यमांमधून लैंगिक जागृतीबाबत चुकीची किंवा अपुरी माहिती दिल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

याप्रसंगी माहिती आणि जनसंपर्क विभागाचे निवृत्त संचालक वसंतराव शिर्के, पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. राजश्री साकळे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. अश्विनी पाटील, डॉ. अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सामाजिक बांधिलकी अधिकारी शरद आजगेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

तेजश्री शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. मानस संस्थेच्या अध्यक्ष स्मिता पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 FEB 2026 तरूण भारत

# वास्तवाशी जोडलेले प्रभावी माध्यम म्हणजे चित्रपट : डॉ. डेल्फिन डिसिल्वा

## शिवाजी विद्यापीठात ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

चित्रपट हे साहित्य, समाज आणि वास्तव जीवनाशी जोडलेले प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन लिस्बन (पोर्तुगाल) येथील कमॉईश इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी बुधवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा अधिविभाग आणि कमॉइश इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या चौदाव्या ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन द सिल्वा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात हा तीन दिवसीय महोत्सव सुरू आहे. डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा म्हणाले, चित्रपटांमधून विविध देशांचे धर्म, संस्कृती, भाषा आणि मानवी अनुभव समजून घेता येतात. महोत्सवाच्या माध्यमातून विविध देशांची भाषा, संस्कृती, इतिहास आणि मानवी मूल्यांचा परिचय विद्यार्थ्यांना होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### जागतिक पुरस्कारप्राप्त चित्रपट पाहण्याची संधी

महोत्सवात तीन दिवसांत जागतिक पुरस्कारप्राप्त पोर्तुगीज आणि ब्राझिलियन अशा दहा चित्रपटांचे प्रदर्शन होणार आहे. विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थी त्यात सहभागी झाले आहेत. याचा सर्वांनी आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सरवदे यांनी केले आहे.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी चित्रपट हे जागतिक भाषा, संस्कृती, भूगोल आणि इतिहास समजून घेण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे यांनी कमॉइश इन्स्टिट्यूटसोबतच्या सामंजस्य कराराविषयी माहिती दिली.

माजी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी ब्राझिलियन चित्रपट महोत्सवांचे स्मरण करून दिले. यावेळी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, स्नेहल शेट्ये आदी उपस्थित होते. अदिती दळवी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यापीठातील विविध विभागेंचे प्रमुख उपस्थित होते. ज्योती पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2026 सकाळ

# रंगली संवादिनीची जुगलबंदी

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीच्या दुसऱ्या दिवशी आज संवादिनीची बहारदार जुगलबंदी रंगली, तर दुसऱ्या सत्रात शास्त्रीय गायनाने पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात झालेल्या या महोत्सवाची सांगता झाली.

पहिल्या सत्रात डॉ. सुधांशू कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांनी संवादिनी वादन केले. राग 'गावती'मध्ये विलंबित एकताल तसेच द्रूत तीनतालातील बंदिशी त्यांनी सादर केल्या. त्यानंतर राग 'श्री'मधील ताल रुपकातील बंदिश सादर केली. 'दे हाता शरणागता' या नाट्यगीताबरोबरच 'माझे माहेर पंढरी' या अभंगाने त्यांनी जुगलबंदी सांगता केली. त्यांना गिरीधर कुलकर्णी यांनी संगीतसाथ केली.



कोल्हापूर : राजर्षी शाहू संगीत रजनीच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी डॉ. सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांचे बहारदार संवादिनी वादन रंगले.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. विजय कोपरकर यांचे शास्त्रीय गायन झाले. 'जोग' या रागाने त्यांनी गायनाला प्रारंभ केला. विलंबित एकतालात 'प्रथम सूर साधे' ही बंदिश, तर द्रुत तीन तालात 'ग्यानी गुनी ग्यानी' ही रचना त्यांनी सादर केली. त्यानंतर 'चंद्रकंस' रागातील विलंबित झपतालातील 'येरी माई कौन' ही बंदिश सादर केली. राग 'भैरवी'तील दादरा तालातील रचना सादर करून त्यांनी गायनाची सांगता केली. त्यांना महेश देसाई, स्वरूप दिवाण यांनी संगीतसाथ केली. पं. अरुण कुलकर्णी, पं. सुधीर पोटे, डॉ. ज. ल. नागांवकर, डॉ. नंदकुमार जोशी, विनोदकुमार लोहिया, डॉ. शीतल धर्माधिकारी, केदार वैशंपायन आदींची प्रमुख उपस्थिती होती. संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2026

लोकमत

# बहारदार संवादिनी जुगलबंदीने संगीत रजनीची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीची बहारदार संवादिनी व शास्त्रीय संगीताने बुधवारी सांगता झाली. राम गणेश गडकरी हॉलमध्ये रंगलेल्या या संगीत रजनीत बेळगावच्या डॉ.सुधांशु कुलकर्णी व सारंग कुलकर्णी यांनी संवादिनी वादनाने मैफलीला रंग चढवला. राग गावतीमध्ये विलंबित एकताल व द्रुत तीन तालातील बांदिशी सादर केल्या. माझे माहेर पंढरी या अभंगाने जुगलबंदीची त्यांनी सांगता केली. दुसऱ्या सत्रात शास्त्रीय गायक विजय कोपरकर यांचे शास्त्रीय गायन झाले. त्यांनी जोग या रागाने सुरुवात केली. विलंबित एकतालात प्रथम सूर साधे ही बांदिश तर द्रूत तीनतालात ग्यानी गुनी ग्यानी ही रचना सादर केली. त्यांना महेश देसाई यांनी तबल्याची साथ दिली. तर संवादिनिची साथ स्वरुप दिवान यांनी केली. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. मनीष आपटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी पं. अरुण कुलकर्णी, सुधीर पोटे, डॉ.ज.ल. नागावकर, डॉ. नंदकुमार जोशी, विनोदकुमार लोहिया, शीतल धर्माधिकारी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीची बहारदार संवादिनी व शास्त्रीय संगीताने बुधवारी सांगता झाली.

1 2 FEB 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विशेष संख्याशास्त्रीय सादरीकरणात कवठेमहांकाळचे महाविद्यालय प्रथम

**जनप्रवास : कोल्हापूर**

दैनंदिन जीवनातील वास्तव समस्यांवर संख्याशास्त्र उपयुक्त ठरू शकते, याची प्रचिती देणाऱ्या विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेमध्ये कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या निमित्ताने १० रोजी संख्याशास्त्राच्या बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या परिसरातील प्रति व्यक्ती मासिक वाहन इंधन वापराचा अंदाज' या विषयावर स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत एकूण दहा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला.



- **'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' वर कार्यशाळेत घेतली स्पर्धा**
- **१० महाविद्यालयांचा सहभाग**

प्रथम फेरीतून एल. बी. एस. महाविद्यालय (सातारा), पी.डी. व्ही.पी. महाविद्यालय (तासगाव), पी.व्ही.पी. महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि एस.जी.एम. महाविद्यालय (कराड) यांचे संघ अंतिम फेरीसाठी पात्र झाले. या महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कार्यशाळेमध्ये त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांनी द्वितीय आणि सद्‌गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालय, कराड यांनी तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून डॉ. शशिभूषण महाडिक आणि गणेश खटावकर यांनी काम पाहिले.

या कार्यशाळेत ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. महाडिक आणि डॉ. सोमनाथ पवार यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरण, सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बी.एस्सी. तृतीय वर्ष सांख्यिकीचे विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 FEB 2026 पुण्यनगरी

# विशेष संख्याशास्त्रीय सादरीकरणात कवठेमहांकाळचे महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनातील वास्तव समस्यांवर संख्याशास्त्र उपयुक्त ठरू शकते, याची प्रचिती देणाऱ्या विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेमध्ये कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या निमित्ताने संख्याशास्त्राच्या बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या परिसरातील प्रतिव्यक्ती मासिक वाहन इंधन वापराचा अंदाज' या विषयावर स्पर्धा घेण्यात आली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष संख्याशास्त्रीय सादरीकरणात यश मिळवलेल्या संघास गौरवताना मान्यवर.

या स्पर्धेत एकूण दहा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. प्रथम फेरीतून एल. बी. एस. महाविद्यालय (सातारा), पी. डी.व्ही.पी. महाविद्यालय (तासगाव), पी.व्ही.पी. महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि एस.जी.एम. महाविद्यालय (कराड) यांचे संघ अंतिम फेरीसाठी पात्र झाले. या महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी कार्यशाळेमध्ये त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर यांनी द्वितीय आणि सद्गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालय, कराड यांनी तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून डॉ. शशिभूषण महाडिक आणि गणेश खटावकर यांनी काम पाहिले.

या कार्यशाळेत ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. महाडिक आणि डॉ. सोमनाथ पवार यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बी.एस्सी. तृतीय वर्ष सांख्यिकीचे विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार मानले.

जनसंपर्क क[illegible]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 FEB 2026

तरूण भारत

# प्रकल्प सादरीकरणात 'वसंतरावदादा महाविद्यालय प्रथम

- विद्यापीठात संख्याशास्त्रीय प्रकल्प सादरीकरण स्पर्धेचे आयोजन
- वाहन इंधन वापराच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची सांख्यिकीची गुणवत्ता अधोरेखित



प्रतिनिधी
कोल्हापूर

दैनंदिन जीवनातील प्रश्नांवर संख्याशास्त्राच्या आधारे तोडगा काढता येतो, याचा ठळक प्रत्यय देणाऱ्या विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत कवठेमहांकाळच्या पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील संख्याशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'वास्तव समस्यांचे सांख्यिकीय विश्लेषण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या निमित्ताने बी. एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रकल्प सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी 'माझ्या परिसरातील प्रति व्यक्ती मासिक वाहन इंधन वापराचा अंदाज' हा विषय देण्यात आला होता. ग्रामीण व शहरी भागातील वाहन वापर, इंधन खर्च आणि त्याचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम याचा विद्यार्थ्यांनी सांख्यिकीय पद्धतीने अभ्यास केला. या स्पर्धेत एकूण दहा महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. प्राथमिक फेरीतून एल. बी. एस. महाविद्यालय (सातारा), पी. डी. व्ही. पी. महाविद्यालय (तासगाव), पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय (कवठेमहांकाळ), विवेकानंद महाविद्यालय (कोल्हापूर) आणि एस. जी. एम. महाविद्यालय (कराड) हे संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले.अंतिम फेरीत प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. त्यात पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालयाने (कवठेमहांकाळ) प्रथम, विवेकानंद महाविद्यालयाने (कोल्हापूर) द्वितीय, सद्गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालयाने (कराड) तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेचे परीक्षण डॉ. शशिभूषण महाडिक व गणेश खटावकर यांनी केले. यावेळी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. महाडिक आणि डॉ. सोमनाथ पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, मुंबई विद्यापीठ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बी. एस्सी. तृतीय वर्षाचे विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सुकुमार राजगुरू यांनी आभार

1 2 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साहित्य, समाज, वास्तवाशी जोडलेले चित्रपट हे प्रभावी माध्यम

## डॉ. डेल्फिम द सिल्वा; शिवाजी विद्यापीठात ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन

कोल्हापूर: चित्रपट हे साहित्य, समाज आणि वास्तव जीवनाशी जोडलेले प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन लिस्बन (पोर्तुगाल) येथील कमॉईश इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा अधिविभाग आणि कमॉइश इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या चौदाव्या ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन द सिल्वा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात हा तीन दिवसीय महोत्सव सुरू आहे.



ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. अक्षय सरवदे.

डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा म्हणाले, चित्रपटांमधून विविध देशांचे धर्म, संस्कृती, भाषा आणि मानवी अनुभव समजून घेता येतात. कल्पनारम्य कथादेखील वास्तव जीवनातूनच जन्म घेतात आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देतात. या महोत्सवाच्या माध्यमातून विविध देशांची भाषा, संस्कृती, इतिहास आणि मानवी मूल्यांचा परिचय विद्यार्थ्यांना होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. पोर्तुगालचे भारताशी असलेले जुने संबंध, तसेच या मैत्रीपूर्ण संबंधांचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी चित्रपट हे जागतिक भाषा, संस्कृती, भूगोल आणि इतिहास समजून घेण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. मराठा साम्राज्याच्या इतिहासात पोर्तुगीजांच्या ऐतिहासिक संदर्भांची मोलाची मदत झाल्याचे त्यांनी नमूद केले.

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे यांनी कमॉइश इन्स्टिट्यूटसोबतच्या सामंजस्य कराराविषयी उपस्थितांना अवगत केले. माजी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी पोर्तुगाल भेटीचा अनुभव आणि गतवर्षी आयोजित पोर्तुगीज व ब्राझिलियन चित्रपट महोत्सवांचे स्मरण करून दिले. विद्यार्थ्यांना विदेशी संस्कृती आणि साहित्याशी जोडणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, स्नेहल शेट्ये आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन आदिती दळवी यांनी केले, आभार ज्योती पाटील यांनी मानले.

1 2 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# समाज, वास्तवाशी जोडलेले चित्रपट प्रभावी माध्यम

## डेल्फिम द सिल्वा : ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे शिवाजी विद्यापीठात शानदार उद्घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

चित्रपट हे साहित्य, समाज आणि वास्तव जीवनाशी जोडलेले प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन लिस्बन (पोर्तुगाला) येथील कमॉईश इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा अधिविभाग आणि कमॉइश इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौदाव्या ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन द सिल्वा यांच्या हस्ते केले. त्यावेळी ते बोलत होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात हा तीनदिवसीय महोत्सव सुरू आहे.

डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा म्हणाले, कल्पनारम्य कथादेखील वास्तव जीवनातूनच जन्म घेतात आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देतात. या महोत्सवाच्या माध्यमातून विविध देशांची भाषा, संस्कृती, इतिहास आणि मानवी मूल्यांचा परिचय विद्यार्थ्यांना होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित ल्युसोफोन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना लिस्बनच्या कमॉईश इन्स्टिट्यूटचे डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा. सोबत (डावीकडून) डॉ. मेघा पानसरे, डॉ. अक्षय सरवदे आणि डॉ. विलास शिंदे.**

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी चित्रपट हे जागतिक भाषा, संस्कृती, भूगोल आणि इतिहास समजून घेण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. मराठा साम्राज्याच्या इतिहासात पोर्तुगीजांच्या ऐतिहासिक संदर्भांची मोलाची मदत झाल्याचे त्यांनी नमूद केले.

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. अक्षय सरवदे यांनी कमॉइश इन्स्टिट्यूटसोबतच्या सामंजस्य कराराविषयी उपस्थितांना अवगत केले. माजी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी पोर्तुगाल भेटीचा अनुभव आणि गतवर्षी आयोजित पोर्तुगीज व ब्राझिलियन चित्रपट महोत्सवांचे स्मरण करून दिले. विद्यार्थ्यांना विदेशी संस्कृती आणि साहित्याशी जोडणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, स्नेहल शेट्ये आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अदिती दळवी यांनी सूत्रसंचालन केले, तर ज्योती पाटील यांनी आभार मानले.

### जागतिक पुरस्कारप्राप्त चित्रपट पाहण्याची संधी

या चित्रपट महोत्सवात तीन दिवसांत जागतिक पुरस्कारप्राप्त पोर्तुगीज आणि ब्राझिलियन अशा दहा चित्रपटांचे प्रदर्शन होणार असून विविध विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थी त्यात सहभागी झाले आहेत. या महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सरवदे यांनी केले आहे.

12 FEB 2026

जनसंपर्क कक्ष

जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शाश्वत कृषी विकासासाठी विविध विद्याशाखांत समन्वय आवश्यक : डॉ. ज्योती जाधव

**जनप्रवास : कोल्हापूर**

शाश्वत कृषी विकासासाठी हवामान, पर्यावरण आणि संख्याशास्त्र या विविध विद्याशाखांमध्ये संतुलित समन्वय महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "दिवंगत डॉ. सुलोचना गाडगीळ आणि डॉ. माधव गाडगीळ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शाश्वत कृषीसाठी हवामान, पर्यावरण व सांख्यिकी" या पीएम-उषा पुरस्कृत कार्यशाळा सोमवारी (दि. ९) झाली. यावेळी उद्घाटन समारंभामध्ये डॉ. जाधव बोलत होत्या. त्या म्हणाल्या, शाश्वत शेती, पर्यावरणीय समतोल आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आंतरविद्याशाखीय संशोधनाची नितांत आवश्यकता आहे. सांख्यिकी, जीवनविज्ञान, पर्यावरणशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समन्वय भविष्यातील संशोधन कार्यामध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावणार आहे. कार्यशाळेचे संसाधन व्यक्ती डॉ. अनिल गोरे यांनी हवामानविषयक माहिती, पर्जन्यमानाचे विश्लेषण आणि कीड-रोग नियंत्रणासाठी सांख्यिकी पद्धतींचा उपयोग यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस संख्याशास्त्र, वनस्पतिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, सुकुमार राजगुरू आणि डॉ. सचिन पाटील यांनी परिश्रम घेतले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. अनिल गोरे, डॉ. शशीभूषण महाडिक आदी.**

## विविध ज्वलंत विषयांवर चर्चा

महाराष्ट्रातील पावसावर अवलंबून शेती, पिकांवरील कीड व बुरशीजन्य रोग, तसेच रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी डेटा-आधारित निर्णय प्रणाली या विषयांवर कार्यशाळेत सखोल चर्चा झाली.

12 FEB 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृषी विकासासाठी विद्याशाखांत समन्वय हवा

## - डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शाश्वत कृषी विकासासाठी हवामान, पर्यावरण आणि संख्याशास्त्र या विविध विद्याशाखांमध्ये संतुलित समन्वय महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दिवंगत डॉ. सुलोचना गाडगीळ आणि डॉ. माधव गाडगीळ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शाश्वत कृषीसाठी हवामान, पर्यावरण व सांख्यिकी' या पीएम उषा पुरस्कृत कार्यशाळा सोमवारी झाली. यावेळी उद्घाटन समारंभामध्ये त्या बोलत होत्या.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, शाश्वत शेती, पर्यावरणीय समतोल आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आंतरविद्याशाखीय संशोधनाची नितांत आवश्यकता आहे.

सांख्यिकी, जीवन विज्ञान, पर्यावरणशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समन्वय भविष्यातील संशोधन कार्यामध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावणार आहे.

कार्यशाळेचे संसाधन व्यक्ती डॉ. अनिल गोरे यांनी हवामानविषयक माहिती, पर्जन्यमानाचे विश्लेषण आणि कीड-रोग नियंत्रणासाठी सांख्यिकी पद्धतींचा उपयोग यावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस संख्याशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यशाळेच्या आयोजनासाठी अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, सुकुमार राजगुरू आणि डॉ. सचिन पाटील यांनी परिश्रम घेतले.

1 2 FEB 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी अर्ज छाननीची प्रक्रिया संपन्न

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी इच्छुक असलेल्या सुमारे ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. या उमेदवारांच्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया सोमवारी आणि मंगळवारी कुलगुरू शोध समितीकडून राबवण्यात आली. त्यातून समितीकडून २५ उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट केली जाणार आहेत.

विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला. त्यानंतर कुलगुरू शोध समितीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया २३ डिसेंबर रोजी सुरू केली. समितीने दिलेल्या मुदतीत विद्यापीठ कार्यक्षेत्रासह राज्यातील साधारणतः ११५ उमेदवारांनी अर्ज केले. त्यात विद्यमान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. एस. चव्हाण, सागर डेळेकर, एस. एस. कोळेकर, के. एम. गरडकर, अनिल घुले, जी. बी. कोळेकर, आर. व्ही. गुरव, आर. जी. सोनकवडे, एस. एस. महाजन, ज्ञानदेव तळुले, निशा मुडे-पवार, एम. एस. देशमुख, रामचंद्र पवार, तर विद्यापीठ बाहेरील अन्य उमेदवारांमध्ये होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींची नावे आहेत.

1 2 FEB 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात सांख्यिकीय विभागातर्फे कार्यशाळा

कोल्हापूर:शिवाजी विद्यापीठातील सांख्यिकी विभागाच्या वतीने मंगळवारी 'स्टॅटिस्टिकल एक्सप्लोरेशन ऑफ रिअल प्रॉब्लेम्स" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेत सांख्यिकी या विषयाच्या दैनंदिन जीवनातील आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी होणारा वापरावर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. सांख्यिकी विभागप्रमुख प्रा. शशिभूषण बी. महाडिक यांनी प्रास्ताविक केले. यावेळी निवृत्त प्राध्यापक प्रा. अनिल गोरे यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'सॉफ्ट स्किल्स", संभाषण कौशल्य आणि गुगल व एआय चा प्रभावी वापर करण्यावर भर दिला पाहिजे, असे संगितले. डॉ. सुवर्णा गोडसे–पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 FEB 2026 तरुण भारत

# शाश्वत शेतीसाठी आंतरविद्याशाखीय संशोधन हवे

## प्रभारी प्र कुलगुरु ज्योती जाधव : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शाश्वत कृषी विकासासाठी हवामान, पर्यावरण आणि संख्याशास्त्र या विविध विद्या शाखांमध्ये संतुलित समन्वय महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' डॉ. सुलोचना गाडगीळ आणि डॉ. माधव गाडगीळ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शाश्वत कृषीसाठी हवामान, पर्यावरण व सांख्यिका" या पीएम-उषा पुरस्कृत कार्यशाळा सोमवारी झाली. यावेळी



उद्घाटन प्रसंगी डॉ. जाधव बोलत होत्या.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, शाश्वत शेती, पर्यावरणीय समतोल आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आंतरविद्याशाखीय संशोधनाची नितांत आवश्यकता आहे.

कार्यशाळेचे संसाधन व्यक्ती डॉ. अनिल गोरे यांनी हवामानविषयक माहिती, पर्जन्यमानाचे विश्लेषण आणि कीड-रोग नियंत्रणासाठी सांख्यिकी पद्धतींचा उपयोग यावर मार्गदर्शन केले.

पिकांवरील कीड व बुरशीजन्य रोग, तसेच रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी डेटा-आधारित निर्णय प्रणाली यावर कार्यशाळेत चर्चा झाली.

कार्यशाळेस संख्याशास्त्र, वनस्पतिशास्त्र, पर्यावरणशास्त्र, प्राणीशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, सुकुमार राजगुरू आणि डॉ. सचिन पाटील यांनी परिश्रम घेतले.